Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व
१७९ बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबूर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं/परीक्षा-७/१०३६
दिनांक ०६/०३/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या इ.१० वी परीक्षेसाठी शास्त्रीय कला, लोककला व चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ:-
१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण--२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४/१२/२०२५.
३. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा--७/१६६ दि.१६/०१/२०२६ चे पत्र
४. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे संकीर्ण--३८२६/प्र.क्र.०३/एस.डी.२,दि.३०/०१/२०२६ चे पत्र
५. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा--७/४५२ दि.०२/०२/२०२६ चे पत्र
६. शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १३/०१/२०२६
७. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा--७/६४२ दि.१४/०२/२०२६ चे पत्र
८. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा--७/७३५ दि.१८/०२/२०२६ चे पत्र
९. विभागीय सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ यांचे जा.क्र/कोविमं/माध्य.परीक्षा/९३० दिनांक ०५ मार्च २०२६
१०. विभागीय सचिव, कोकण विभागीय मंडळ यांचे जा.क्र/कोविमं/शाखा १० वी परीक्षा/८९९ दिनांक ०५ मार्च २०२६

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या इ.१० वी परीक्षेसाठी शास्त्रीय कला, लोककला व चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दि.२८/०२/२०२६ पर्यंत सादर करण्यास संदर्भ क्र.८ नुसार मुदतवाढ देण्यात आली होती.

तथापि, संदर्भ क्र.९ व १० नुसार विभागीय मंडळातील संबंधित शाळांनी फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या इ.१०वी परीक्षेसाठी शास्त्रीय कला, लोककला व चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदर प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास दि.०७ मार्च, २०२६ ते ०९ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/950
कोल्हापूर -४१६००४
दिनांक:- 06 MAR 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय.- फेब्रु. मार्च- २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन फेब्रु./मार्च- २०२६ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास राज्य मंडळ, पुणे यांचे वरील पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

for विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर (करीता)